॥ श्री नवनाथभक्तिसार ॥

Shri Navnath Bhaktisar

ADHYAYA 7 --- SAPTAMADHYAAYA

Machchindranath & Veerabhadra at Hareshvara --- Enemies Become Allies

श्रीगणेशाय नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीपांडुरंगाय नमः । श्रीकुलदेवतायै नमः । श्रीमातापितृभ्यां नमः ।

Shri Ganeshaaya Namah | Shri Gurubhyo Namah | Shri Paandurangaaya Namah | Shri Kuladevataayai Namah | Shri Maataa pitribhyaam Namah |

Summary

After receiving the Sabari Vidya from Goddess Kalika at the close of the previous chapter, Machchindranath travels to the sacred site of Hareshwar to bathe at Gada Tirtha, where he encounters Lord Shiva's fierce son, Veerabhadra. Mistaking the master's Nath panth attire for empty show, Veerabhadra mocks him and challenges him to single combat. An escalating war of divine weapons erupts, moving through the Brahmastra and Agni-astra until Veerabhadra unleashes a catastrophic Maya-astra that threatens to unmake creation. At the anxious plea of the watching gods, Machchindranath peacefully subdues the weapon, prompting an awed Veerabhadra to embrace him as a friend. Delighted by this cosmic reconciliation, the supreme Trinity and the Vedic deities bestow powerful boons upon Machchindranath to aid his mission. He is then escorted as an honored guest through the heavenly realms of Vaikuntha and Kailasa for several years. Upon returning to Earth, the goddess at the Vajrabhagavati shrine reveals the ancient history of the local holy hot springs before Machchindranath sets out toward Ayodhya.

Ovee 1

जयजयाजी पंकजाक्षा । कमलापते कमलपत्राक्षा । अचगुणरुपा गुणसर्वेशा । महादक्षा रघुत्तमा ॥

Transliteration

Jaya-jaya-ji pankaja-akshaa | Kamalaapate kamala-patra-akshaa | Ava-guna-rupaa guna-sarveshaa | Mahaadakshaa Raghuttamaa ||

Ovee 2

हे कमळमित्रकुळभूषणा । रावणांतका रघुनंदना । पुढें बोलवीं ग्रंथरचना । जेणें श्रोतयां सुख वाटे ॥

Transliteration

Hey Kamala-Mitra-kula-bhooshanaa | Raavana-antakaa Raghu-nandanaa | Pudhe bolavee grantha-rachanaa | Jene shrotayaa sukha vaate ||

Ovee 3

मागिले अध्यायीं कथा सुरस । काळिका देवी मच्छिंद्रास । प्रसन्न होऊनि वरदानास । साबरीविद्या आतुली ॥

Transliteration

Maagile adhyaayee kathaa surasu | Kaalikaa Devee Machchindraasu | Prasanna houuni vara-daanu-aasu | Saabaree Vidyaa aatulee ||

Ovee 4

तेथूनि आला हरेश्वरासी । गदातीर्थस्नानउद्देशीं । स्नान करुनि पर्वतासी । प्रदक्षिणा आरंभिली ॥

Transliteration

Tethuuni aalaa Hareshvaraasee | Gadaa-teertha-snaana-uddeshee | Snaana karuni parvataasee | Pradakshinaa aaranbhilee ||

Ovee 5

सर्वेंचि येतां मच्छिंद्रनाथ । तो वीरभद्र पातला स्नाना तेथ । मानववेषी जोगी कृत्य । त्रिशूळ डमरु धनुष्यादि ॥

Transliteration

Sarvenchi yetaa Machchindra Naathu | Toh Veerabhadra paatalaa snaanaa tethu | Maanava-veshee jogee krityu | Trishoola damaru dhanushyaadi ||

Ovee 6

शैली शिंगी नाद अद्भुत । नाद नोहे तो आगम व्यक्त । साधहिताचा स्वार्थअर्थ । परिणाम सूचवी ॥

Transliteration

Shailee shingee naada adbhutu | Naada nohe toh aagama vyaktu | Saadhaka-hitaachaa svaartha-arthu | Parinaama soochavee ||

Ovee 7

अहो ती शिंगी नोहे देवता । साधकजनांची कामदुहिता । पूर्ण करावया परिणाम अर्था । बोधरवि प्रवेशती ॥

Transliteration

Aho tee shingee nohe devataa | Saadhaka-janaanchee kaama-duhitaa | Poorna karaavayaa pari-naama arthaa | Bodha-ravi praveshatee ||

Ovee 8

रज तम सत्त्व तृतीय गुण । महामारक अति कठिण । ते त्रिवर्ग करिती खडतरपण । ऐक्य केला त्रिशूळ तो ॥

Transliteration

Raja tama sattva triteeya gunu | Mahaa-maaraka ati kathinu | Tey trivarga karitee khadatarapanu | Aikya kelaa Trishoola toh ||

Ovee 9

यापरी आगमनिगमबीजें । सारव्यक्त तेज:पुंजें । तयाची पंथिका दावी करांबुजे । विशाळ डमरु विराजला ॥

Transliteration

Yaaparee aagama-nigama-beeje | Saara-vyakta tejapunje | Tayaachee panthikaa daavee karaanbuje | Vishaala damaru viraajalaa ||

Ovee 10

सगुणकथा सप्तधातु । गुणीं भरला गुणातीतु । नवरंगरसांत झाला व्यक्तु । हरिगुणींचि भक्तु होईना कां ॥

Transliteration

Saguna-kathaa sapta-dhaatu | Gunee bharalaa gunaateetu | Nava-ranga-rasa-anta jhaalaa vyaktu | Hariguneenchi bhaktu hoeenaa kaa ||

Ovee 11

कामक्रोधषड्गुणविकार । सत्त्वस्थाचे शत्रु अनिवार । तयां जिंकितां विवेक फार । शरगांडीव विराजलें ॥

Transliteration

Kaama-krodha-shadguna-vikaaru | Sattvasthaache shatru anivaaru | Tayaa jinkitaa viveka phaaru | Shara-Gaandeeva viraajale ||

Ovee 12

अहो शर नोहे ते जाण युक्ती । कामक्रोधांतें देत मुक्ती । गांडीव नोहे तें विषयभक्ती । ज्ञानशरीं विराजलें ॥

Transliteration

Aho shara nohe tey jaana yuktee | Kaama-krodhaate deta muktee | Gaandeeva nohe tey vishaya-bhaktee | Jnana-sharee viraajale ||

Ovee 13

अगा शर न म्हणूं ते ज्ञानदिवटी । अज्ञानतमींचें द्वंद्व निवटी । अलक्षसंधानपूर्णकोटी । भेदाभेद सर्वथा ॥

Transliteration

Agaa shara na mhanoo tey jnana-divatee | Ajnana-tameenche dvandva nivatee | Alaksha-sandhaana-poorna-kotee | Bhedaa-bheda sarvathaa ||

Ovee 14

ऐसा महाराज प्रतापरुद्र । द्वंद्वलेश नसे मनीं वीरभद्र । अज्ञानतमींचा महाचंद्र । मच्छिंद्रातें भेटला ॥

Transliteration

Aisaa Mahaaraaja prataapa-Rudru | Dvandvalesha nase manee Veerabhadru | Ajnana-tameenchaa mahaa-Chandru | Machchindraate bhetalaa ||

Ovee 15

मच्छिंद्र करुनि येतसे स्नान । वीरभद्र येतसे स्नानालागून । तों मार्गी मच्छिंद्रातें पाहून । उभा केला हटकोनी ॥

Transliteration

Machchindra karuni yetase snaanu | Veerabhadra yetase snaanaa-laaguunu | Toh maargee Machchindraate paahuunu | Ubhaa kelaa hatakonee ||

Ovee 16

करुनि उभे नमनानमन । म्हणे स्वामी तुम्ही कोण । येरु म्हणे मच्छिंद्र अभिधान । निजदेहा मिरवीतसे ॥

Transliteration

Karuni ubhe namanaa-namanu | Mhane svaamee tumhee konu | Yeru mhane Machchindra abhidhaanu | Nijadehaa miraveetase ||

Ovee 17

येरु म्हणे कवण पंथी । अभ्यास मिरवतसां जगाप्रती । मच्छिंद्र म्हणे जोगीये नीती । नाथपंथी मिरवीतों ॥

Transliteration

Yeru mhane kavana panthee | Abhyaasa miravitasaa jagaapratee | Machchindra mhane jogeeye neetee | Naatha-panthee miraveeto ||

Ovee 18

येरु म्हणे कोण दर्शन । मच्छिंद्र म्हणे जोगीमहिमान । शैली कंथा मुद्रा भूषण । निजअंगीं मिरवीतसें ॥

Transliteration

Yeru mhane kona darshanu | Machchindra mhane jogee-mahimaanu | Shailee kathaa mudraa bhooshanu | Nija-angee miraveetase ||

Ovee 19

वीरभद्र म्हणे मुद्रा सान । न घालितां फाडिले कान । येरु म्हणे गुरुप्रसादें करुन । मंथनीं निर्मिला हा एक ॥

Transliteration

Veerabhadra mhane mudraa saanu | Na ghaalitaa phaadile kaanu | Yeru mhane guru-prasaade karunu | Manthanee nirmilaa haa eku ||

Ovee 20

वीरभद्र म्हणे काय पाखंड । व्यर्थचि उगलें वाढवूनि बंड । जगामाजी मिरवितां काळें तोंड । योग्यायोग्य दिसेना ॥

Transliteration

Veerabhadra mhane kaaya paakhandu | Vyarthachi ugale vaadhavuuni bandu | Jagaa-maajee miravitaa kaale tondu | Yogyaa-yogya disenaa ||

Ovee 21

तरी आतां योगद्रुमा । मुद्रा सोडीं ह्या नसती उत्तमा । नाहीं तरी शिक्षा पावसी नेमा । ठाईं ठाईं महाराजा ॥

Transliteration

Taree aataa yoga-drumaa | Mudraa sodee hyaa nasatee uttamaa | Naahee taree shikshaa paavasee nemaa | Thaaee thaaee Mahaaraajaa ||

Ovee 22

अगा तव गुरु ऐसा कोण । वेदविधिच्या प्राज्ञेंकरुन । पूर्ण आगळीक पंथ निर्मून । जगामाजी मिरवतो ॥

Transliteration

Agaa tava guru aisaa konu | Veda-vidhi-chyaa praajnyen-karunu | Poorna aagaleeka pantha nirmuunu | Jagaa-maajee miravato ||

Ovee 23

अगा स्वबुद्धीं तर्क करुन । भलतेंचि मत करी स्थापन । तो प्राज्ञिक नव्हे मुर्खाहून । शतमूर्ख म्हणावा ॥

Transliteration

Agaa svabuddhee tarka karunu | Bhalatenchi mata karee sthaapanu | Toh praajnyika navhe murkhaa-huunu | Shata-moorkha mhanaavaa ||

Ovee 24

ऐसी ऐकतां भद्रगोष्टी । मच्छिंद्र संतप्त झाला पोटीं । म्हणे मशका खोटी । वल्गना करिसी अपार ॥

Transliteration

Aisee aikataa Bhadra-goshtee | Machchindra santapta jhaalaa potee | Mhane mashakaa khatee | Valganaa karisee apaara ||

Ovee 25

अरे शतमुर्खाहूनि मूर्ख । म्हणूनि बोलसी दुःखदायक । परमात्मा क्षोभवूनि पातक । भार वाहिला निजमौळी ॥

Transliteration

Arey shata-murkhaahuuni moorkhu | Mhanuuni bolasee dukhadaayaku | Paramaatmaa kshobhavuuni paataku | Bhaara vaahilaa nijamaulee ||

Ovee 26

अरे आत्मा क्षोभतां पराचा । पापभार होत ब्रह्मांडींचा । तस्मात् तव गुरु कैंचा । दुजा गुरु विलोकीं ॥

Transliteration

Arey aatmaa kshobhataa paraachaa | Paapabhaara hota Brahmaandeenchaa | Tasmaatu tava guru kainchaa | Dujaa guru vilokee ||

Ovee 27

अरे नष्टा दुर्जन अधमा । तव दर्शने स्नान करणें आम्हां । आतां उगाचि जाय आपुल्या कामा । शिक्षा पावसील मम हस्ते ॥

Transliteration

Arey nashtaa durjana adhamaa | Tava darshane snaana karane aamhaa | Aataa ugaachi jaaya aapulyaa Kaamaa | Shikshaa paavaseela mama haste ||

Ovee 28

ऐशापरी मच्छिंद्रनाथाचें भाषण । ऐकतां वीरभद्राचें क्षोभलें मन । म्हणे भ्रष्टा तुझा प्राण । आतांचि घेईन ये काळीं ॥

Transliteration

Aishaaparee Machchindranaathaache bhaashanu | Aikataa Veerabhadraache kshobhale manu | Mhane bhrashtaa tujhaa praanu | Aataanchi gheeena ye kaalee ||

Ovee 29

मग करीं कवळूनि सायकासन । सत्वर रगडूनि लाविला गुण । निर्वाण अर्धचंद्र बाण । तूणीरांतूनि काढिला ॥

Transliteration

Maga karee kavaluuni saaya-kaasanu | Satvara ragaduuni laavilaa gunu | Nirvaana ardha-chandra baanu | Tooneeraan-tuuni kaadhilaa ||

Ovee 30

तें पाहूनि मच्छिंद्रनाथ । म्हणे पतित झालासी उन्मत्त । अरे उद्धटा आपुलें अहित । जनांमाजी मिरविसी ॥

Transliteration

Tey paahuuni Machchindra Naathu | Mhane patita jhaalaasee unmattu | Arey uddhataa aapule ahitu | Janaan-maajee miravisee ||

Ovee 31

अरे सायकासन सिद्ध करुन । सोंग दाविसी मजलागून । परी हें बरवे नोहे मरण । ये काळीं पावसी ॥

Transliteration

Arey saayakaasana siddha karunu | Songa daavisee majalaaguunu | Paree hey barave nohe maranu | Ye kaalee paavasee ||

Ovee 32

अरे ऐसें सोंग मजकारण । कित्येक झाल अवलोकून । बहुरुप्याचें खडतरपण । शूरत्व रणीं मिरवेना ॥

Transliteration

Arey aise songa majakaaranu | Kityeka jhaala avalokuunu | Bahurupyaache khadatarapanu | Shooratva ranee miravenaa ||

Ovee 33

कीं अजाकंठींचें लंबस्तन । परी नातुडे त्यांत दुग्धपान । तेवीं तूं दाखविसी हावभाव करुन । परी क्षणैक क्षीण होसील कीं ॥

Transliteration

Kee ajaakantheenche lambastanu | Paree naatude tyaanta dugdhapaanu | Tevee too daakhavisee haavabhaava karunu | Paree kshanaika ksheena hoseela kee ||

Ovee 34

वीरभद्र म्हणे मूर्खा ऐक । तूतें दावीन यमलोक । तव आयुष्य सरलें सकळिक । म्हणूनि येथें आलासी ॥

Transliteration

Veerabhadra mhane moorkhaa aiku | Toote daaveena yamaloku | Tava aayushya sarale sakaliku | Mhanuuni yethe aalaasee ||

Ovee 35

तरी मी तूतें काळक्षय । प्रगट झालों आहें प्रत्यक्ष । तरी तव गुरु प्रतापदक्ष । कैसा आहे पाहूं दे ॥

Transliteration

Taree mee toote kaalakshayu | Pragata jhaalo aahe pratyakshu | Taree tava guru prataapa-dakshu | Kaisaa aahe paahoo de ||

Ovee 36

मच्छिंद्र म्हणे मशकासाठीं । मेरु मिळवील काय नगांची कोटी । कीं महाक्षीराब्धी घेऊनि नरोटी । भीक मागेल पोटातें ॥

Transliteration

Machchindra mhane mashakaa-saathee | Meru milaveela kaaya nagaanchee kotee | Kee mahaa-ksheera-abdhee gheuuni narotee | Bheeka maagela potaate ||

Ovee 37

मूर्खा ऐक वचनार्थ । मम गुरुचा मौळीं वरद हस्त । तेणें होतसे शरणागत । मानव दानव देवादि ॥

Transliteration

Moorkhaa aika vachana-arthu | Mama guruchaa maulee varada hastu | Tene hotase sharanaagatu | Maanava daanava devaadi ||

Ovee 38

तेथें अर्भका तुझा पाड । किमर्थ आधीं मिरविसी कोड । महासविता तप्त उजेड । खद्योतातें मिरवेना ॥

Transliteration

Tethe arbhakaa tujhaa paadu | Kimartha aadhee miravisee kodu | Mahaa-Savitaa tapta ujedu | Khadyotaate miravenaa ||

Ovee 39

वीरभद्र म्हणे तूं काय करिशी । मरणकाळीं फांटा फुटला तुजसा । आतां क्षणेंचि भूमीपाशीं । करीन नव्हतासि ऐसें ॥

Transliteration

Veerabhadra mhane too kaaya karishee | Marana-kaalee phaantaa phutalaa tujasaa | Aataa kshanenchi bhoomee-paashee | Kareena navhataasi aise ||

Ovee 40

अरे तव ग्रीवेतें काळपाश । आधींच पावलें आयुष्य नाश । म्हणूनि मूर्खा तूतें हौस । ये वादा स्फुरलासी ॥

Transliteration

Arey tava greevete kaalapaashu | Aadheencha paavale aayushya naashu | Mhanuuni moorkhaa toote hausu | Ye vaadaa sphuralaasee ||

Ovee 41

ऐसें म्हणनि वीरभद्रानें । गुणीं सज्जिलें अस्त्रविंदान । म्हणे भ्रष्टा सावधान । राममंत्र जल्पीं कां ॥

Transliteration

Aise mhanani Veerabhadraane | Gunee sajjile astra-vindaanu | Mhane bhrashtaa saavadhaanu | Raama-mantra jalpee kaa ||

Ovee 42

मच्छिंद्र म्हणे राममंत्र । तूतें वाटला अपवित्र । परी तेणेंचि सुखी पंचवक्र । दुःखलेशी मुकलासे ॥

Transliteration

Machchindra mhane Raama-mantru | Toote vaatalaa apavitru | Paree tenenchi sukhee panchavakru | Dukhaleshee mukalaase ||

Ovee 43

अरे राममंत्रें वाल्या तरला । तें नाम तारील आतांचि मजला । परी सावध तूं होई कां वहिला । राममंत्रावेगळा ॥

Transliteration

Arey Raama-mantre vaalyaa taralaa | Tey naama taareela aataanchi majalaa | Paree saavadha too hoee kaa vahilaa | Raama-mantraa-vegalaa ||

Ovee 44

ऐसें म्हणूनि कक्षे झोळी । विलोकूनि भस्म करीं कवळी । मग शस्त्रास्त्रीं तेणें काळीं । वज्रस्थापना जल्पतसे ॥

Transliteration

Aise mhanuuni kakshe jholee | Vilokuuni bhasma karee kavalee | Maga shastra-astree tene kaalee | Vajra-sthaapanaa jalpatase ||

Ovee 45

पूर्ण प्रयोग घालूनि धाटीं । भोंवतीं फिरवी भस्मचिमुटी । तेणें करुनि वज्रदाटी । दाही दिशा मिरवीतसे ॥

Transliteration

Poorna prayoga ghaaluuni dhaatee | Bhonvatee phiravee bhasma-chimutee | Tene karuni vajradaatee | Daahee dishaa miraveetase ||

Ovee 46

आणिक करीं कवळूनि भस्म । यासी विलोकी योगद्रुम । तों वीरभद्रें सायकें परम । निर्वाण बाण सोडिला ॥

Transliteration

Aanika karee kavaluuni bhasmu | Yaasee vilokee yogadrumu | Toh Veerabhadre saayake paramu | Nirvaana baana sodilaa ||

Ovee 47

तो बाण येतां किंकाटत । दृष्टीं पाहे मच्छिंद्रनाथ । मग आपुले मानी मनांत । बाण आहे तृणासम ॥

Transliteration

Toh baana yetaa kinkaatatu | Drishtee paahe Machchindra Naathu | Maga aapule maanee manaantu | Baana aahe trinaasama ||

Ovee 48

ऐसें म्हणूनि स्तब्धदृष्टी । उभा करीं कवळूनि भस्मचिमुटी । तवं तो बाण नभापोटीं । संचरुनि उतरतसे ॥

Transliteration

Aise mhanuuni stabdha-drishtee | Ubhaa karee kavaluuni bhasma-chimutee | Tava toh baana nabhaapotee | Sancharuni utaratase ||

Ovee 49

मच्छिंद्रनाथातें लक्षून । खालीं उतरतसे घ्यावया प्राण । तों सबळ बळें वज्र येऊन । प्रहार करितें पैं झालें ॥

Transliteration

Machchindranaathaate lakshuunu | Khaalee utaratase ghyaavayaa praanu | Toh sabala bale Vajra yeuunu | Prahaara karite pai jhaale ||

Ovee 50

तरी तें वज्र वरिष्ठ । आदळतांचि बाण झाला पिष्ट । तें पाहूनि वीरभद्र वरिष्ठ । परम चित्तीं क्षोभला ॥

Transliteration

Taree tey Vajra varishthu | Aadalataanchi baana jhaalaa pishtu | Tey paahuuni Veerabhadra varishthu | Parama chittee kshobhalaa ||

Ovee 51

मग शक्तिअस्त्र देदीप्यमान । योजिता झाला रुद्रनंदन । सज्ज करुनि सायकसंधान । साधूनियां प्रेरिलें ॥

Transliteration

Maga shaktiastra daideepyamaanu | Yojitaa jhaalaa Rudra-nandanu | Sajja karuni saayakasandhaanu | Saadhuuniyaa prerile ||

Ovee 52

सर्वेचि काढूनि दुसरा बाण । नागास्त्र तयावरी स्थापून । तोही चुंबीत पावला गगन । पाठोपाठ शक्तीच्या ॥

Transliteration

Sarvechi (Savenchi) kaadhuuni dusaraa baanu | Naagaastra tayaavaree sthaapuunu | Tohee chunbeeta paavalaa gaganu | Paathopaatha shakteenchyaa ||

Ovee 53

परी ती शक्ती बलाढ्य बहुत । स्वर्गी मिरवे शब्द करीत । ऐकतां शब्द भयभीत । सकळ मही झाली असे ॥

Transliteration

Paree tee shaktee balaadhya bahutu | Svargee mirave shabda kareetu | Aikataa shabda bhayabheetu | Sakala mahee jhaalee ase ||

Ovee 54

दिग्गज पळती रानोरान । शेष न ठेवी आपुली मान । वराह पाहूनि अति निर्वाण । दंताने मही सरसावी ॥

Transliteration

Diggaja palatee raano-raanu | Shesha na thevee aapulee maanu | Varaaha paahuuni ati nirvaanu | Dantaane mahee sarasaavee ||

Ovee 55

कूर्म करीतसे सबळ पृष्ठी । पाहूं पातले देव विमानदाटीं । तेही पाहूनि कपाटपोटी । संचरुनि पळतात ॥

Transliteration

Koorma kareetase sabala prishthee | Paahoo paatale deva vimaana-daatee | Tehee paahuuni kapaatapotee | Sancharuni palataata ||

Ovee 56

देवविमानीं हडबड । पाहूनि उडुगण पळती पाड । सोडूनि आपुले कार्य उघड । नभामाजी सरळले ॥

Transliteration

Deva-vimaanee hadabadu | Paahuuni uddagana palatee paadu | Soduuni aapule kaarya ughadu | Nabhaamaajee saralale ||

Ovee 57

देव दानव यक्ष दैत्य । म्हणती पावला प्रळयमृत्यु । ही शक्ति नोहे प्रळय समस्त । मही बुडवील वाटतसे ॥

Transliteration

Deva Daanava Yaksha Daityu | Mhanatee paavalaa pralaya-mrityu | Hee shakti nohe pralaya samastu | Mahee budaveela vaatatase ||

Ovee 58

सबळ बळिष्ठ ती मही कांपत । तेणें नगकड्यांची खांचणी होत । मायलेक चुकूनि निश्चित । रुदन करिती हंबरडे ॥

Transliteration

Sabala balishtha tee mahee kaanpatu | Tene nagakadyaanchee khaanchanee hotu | Maayaleka chukuuni nishchitu | Rudana karitee hanbarade ||

Ovee 59

सहस्त्र विजूंचा कडकडाट । दावूनि शब्द अनिवारलोट । नभमंडळ पाहूनि नीट । शक्ती भेदिली वज्रातें ॥

Transliteration

Sahastra vijoonchaa kadakadaatu | Daavuuni shabda anivaara-lotu | Nabha-mandala paahuuni neetu | Shaktee bhedilee vajraate ||

Ovee 60

तेणें वज्र अति क्षीण । होऊनि पडलें गगनाहून । पुढें मच्छिंद्राचा लक्षूनि प्राण । हरावया येतसे ॥

Transliteration

Tene Vajra ati ksheenu | Houuni padale gaganaahuunu | Pudhe Machchindra-achaa lakshuuni praanu | Haraavayaa yetase ||

Ovee 61

यावरी नागास्त्र निःशक्त । तें पाहूनि मच्छिंद्रनाथ । त्वरें कवळूनि भस्म चिमुटींत । रुद्रास्त्र प्रेरीतसे ॥

Transliteration

Yaavaree Naagaastra nishaktu | Tey paahuuni Machchindra Naathu | Tvare kavaluuni bhasma chimuteentu | Rudraastra prereetase ||

Ovee 62

त्यासवेंचि योजूनि खगेंद्र अस्त्राते । पाठोपाठीं प्रेरीत । परी रुद्रास्त्र झालें व्यक्त । रुद्र एकादश प्रतापी ॥

Transliteration

Tyaasavenchi yojuuni khagendra astraate | Paathopaathee prereetu | Paree Rudraastra jhaale vyaktu | Rudra ekaadasha prataapee ||

Ovee 63

एकादशरुद्रचूडामणी । शक्तीतें तल्लीन करी कवळूनी । तेणें हस्त पाद मूर्धनी । क्षीण होऊनि पडियेली ॥

Transliteration

Ekaadasha-Rudra-choodaamanee | Shakteete talleena karee kavaluunee | Tene hasta paada moordhanee | Ksheena houuni padiyelee ||

Ovee 64

शक्ती पडतां खचूनि महीं । रुद्र मिरवले अदृश्य देहीं । येरीकडे खगेंद्र अही । अस्त्रा अस्त्र भक्षेतसे ॥

Transliteration

Shaktee padataa khachuuni mahee | Rudra miravale adrishya dehee | Yereekade khagendra ahee | Astraa astra bhakshetase ||

Ovee 65

तेणें नागास्त्र त्वरित । अदृश्य झालें युद्धरहित । यावरी अस्त्र विनयासुत । तेंही झालें अदृश्य ॥

Transliteration

Tene Naagaastra tvaritu | Adrishya jhaale yuddha-rahitu | Yaavaree astra vinataasutu (vinayaasutu) | Tenhee jhaale adrishya ||

Ovee 66

यावरी वीरभद्र प्रतापतरणी । वातास्त्र प्रेरिता झाला गगनीं । तें मच्छिंद्रनाथ विलोकुनी । पर्वतास्त्र सोडितसे ॥

Transliteration

Yaavaree Veerabhadra prataapa-taranee | Vaataastra preritaa jhaalaa gaganee | Tey Machchindra Naatha vilokunee | Parvata-astra soditase ||

Ovee 67

तेणें कोंडिला अवघा वात । मग वज्रास्त्र प्रेरी महारुद्रसुत । तेणेंकरुनि चूर्ण पर्वत । अदृश्यपणीं मिरवला ॥

Transliteration

Tene kondilaa avaghaa vaatu | Maga vajraasta preree mahaa-Rudra-sutu | Tenenkaruni choorna parvatu | Adrishyapanee miravalaa ||

Ovee 68

यापरी प्रतापी वीरभद्र त्वरित । प्रेरिता झाला अग्न्यस्त्र । ते पाहूनि मच्छिंद्रनाथ । जलदास्त्र प्रेरीतसे ॥

Transliteration

Yaaparee prataapee Veerabhadra tvaritu | Preritaa jhaalaa agnyastru | Tey paahuuni Machchindra Naathu | Jaladaastra prereetase ||

Ovee 69

त्यानें सकळ अग्नि विझवून । करितें झालें अदृश्य गमन । यावरी वीरभद्रें कामास्त्र सोडून । कामव्यथा योजीतसे ॥

Transliteration

Tyaane sakala agni vijhavuunu | Karite jhaale adrishya gamanu | Yaavaree Veerabhadre Kaamaastra soduunu | Kaama-vyathaa yojeetase ||

Ovee 70

त्यावरी विरक्तनाथ मच्छिंद्र । प्रेरिता झाला रत्यस्त्र । तेणेंकरुनि काम पळत । सुख पावला रतिसंगें ॥

Transliteration

Tyaavaree virakta-Naatha Machchindru | Preritaa jhaalaa ratyastru | Tenenkaruni kaama palatu | Sukha paavalaa ratisange ||

Ovee 71

यावरी वीरभद्र दक्ष । प्रेरिता झाला महोरगास्त्र । तें पाहूनि मच्छिंद्रनाथ । संजिवनी प्रेरितसे ॥

Transliteration

Yaavaree Veerabhadra Dakshu | Preritaa jhaalaa Mahoragaastru | Tey paahuuni Machchindra Naathu | Sanjivanee preritase ||

Ovee 72

वीरभद्र तो वैश्वानर । प्रेरिता झाला दानवास्त्र । मच्छिंद्रनाथ अति तत्पर । देवास्त्र प्रेरितसे ॥

Transliteration

Veerabhadra toh Vaishvaanaru | Preritaa jhaalaa Daanava-astru | Machchindra Naatha ati tatparu | Devaastra preritase ||

Ovee 73

मग अस्त्र तें बळवंत । देव दानव प्रगटले अमित । ते पाहूनियां उभयतांते । स्वग्रीवा तुकविती ॥

Transliteration

Maga astra tey balavantu | Deva Daanava pragatale amitu | Tey paahuuniyaa ubhayataante | Svagreevaa tukavitee ||

Ovee 74

परस्परें धन्य धन्य । वदोनि हृदयीं करिती मान । गदगदोनि हास्यवचन । एकमेका बोलती ॥

Transliteration

Paraspare dhanya dhanyu | Vadoni hridayee karitee maanu | Gadagadoni haasyavachanu | Ekamekaa bolatee ||

Ovee 75

वीरभद्र म्हणे सकळे महीं । वीर जिंकिलें भद्रयुद्धें प्रवाहीं । परी मच्छिंद्रा तुजसमान ये देहीं । देखिला नाहीं कोणीच ॥

Transliteration

Veerabhadra mhane sakale mahee | Veera jinkile bhadrayuddhe pravaahee | Paree Machchindraa tujasamaana ye dehee | Dekhilaa naahee koneecha ||

Ovee 76

मच्छिंद्र म्हणे वरदहस्त । पुढें पहा भद्रजात । येरी म्हणे म्हणे अविनाशवंत । गुरु आहे माझा कीं ॥

Transliteration

Machchindra mhane varadahastu | Pudhe pahaa bhadrajaatu | Yeree mhane avinaashavantu | Guru aahe maajhaa kee ||

Ovee 77

वीरभद्र तुकावूनि मान । म्हणे गुरु तुझा आहे प्राज्ञ । आणि तूंहि त्यांत अससी धन्य । प्राज्ञीकवंत सद्यशा ॥

Transliteration

Veerabhadra tukaavuuni maanu | Mhane guru tujhaa aahe praajnyu | Aani toonhi tyaanta asasee dhanyu | Praajnyeekavanta sadyashaa ||

Ovee 78

ऐसें देवास्त्र युक्तप्रयुक्त । दानव करुनि सकळ शांत । अदृश्यपणीं स्वस्थानांत जाऊनियां पोचलें ॥

Transliteration

Aise devaastra yukta-prayuktu | Daanava karuni sakala shaantu | Adrishyapanee sva-sthaana-anta jaauuniyaa pochale ||

Ovee 79

यावरी वीरभद्र ब्रह्मास्त्र । प्रेरिता झाला अति पवित्र । तें पाहूनियां वरदपात्र । विध्यस्त्र प्रेरितसे ॥

Transliteration

Yaavaree Veerabhadra Brahmaastru | Preritaa jhaalaa ati pavitru | Tey paahuuniyaa varadapaatru | Vidhyastra preritase ||

Ovee 80

तें प्रगटतां चतुर्भुजमूर्ती । विधी लागे चरणाप्रती । यावरी कार्तिकास्त्र भद्रजाती । सोडिता झाला तत्क्षणीं ॥

Transliteration

Tey pragatataa chaturu-bhuja-moortee | Vidhee laage charanaapratee | Yaavaree kaartika-astra Bhadra-jaatee | Soditaa jhaalaa tatkshanee ||

Ovee 81

तें पाहूनियां दत्तवरदपाणी । स्त्रीअस्त्र सोडित गगनीं । तें बोलतां लावण्यखाणीं । स्वामीलागी विहिताती ॥

Transliteration

Tey paahuuniyaa Datta-varada-paanee | Streeastra sodita gaganee | Tey bolataa laavanya-khaanee | Svaamee-laagee vihitaatee ||

Ovee 82

तेणेंकरुनि कार्तिकास्त्र । तत्क्षणीं पावलें शांत । यावरी भद्र तो काळास्त्र । प्रेरिता झाला तत्क्षणीं ॥

Transliteration

Tenenkaruni kaartika-astru | Tatkshanee paavale shaantu | Yaavaree Bhadra toh kaalaastru | Preritaa jhaalaa tatkshanee ||

Ovee 83

तें पाहुनि मच्छिंद्रनाथ । मायाप्रळयी प्रेरिलें अस्त्र । तेणें काळ भक्षूनि पवित्र । पंचतत्त्व कवळीतसे ॥

Transliteration

Tey paahuni Machchindra Naathu | Maayaa-pralayee prerile astru | Tene kaala bhakshuuni pavitru | Pancha-tattva kavaleetase ||

Ovee 84

तें पाहूनि सकळ देव । करिते झालें मच्छिंद्रस्तव । म्हणती महाराजा युगभाव । सकळ नाश पावेल कीं ॥

Transliteration

Tey paahuuni sakala devu | Karite jhaale Machchindrastavu | Mhanatee Mahaaraajaa yugabhaavu | Sakala naasha paavela kee ||

Ovee 85

म्हणती महाराजा कलिभाग । पुढें आहे अनंतयुग । तों आजि तुम्ही सकळ याग । विनाशरुपी पाहतां कीं ॥

Transliteration

Mhanatee Mahaaraajaa kalibhaagu | Pudhe aahe anantayugu | Toh aaji tumhee sakala yaagu | Vinaasha-rupee paahataa kee ||

Ovee 86

तरी आतां कृपाकरुन । मायाप्रळय घ्या आवरुन । मग देववाणी श्रवणीं ऐकून । वासनीक अस्त्र प्रेरितसे ॥

Transliteration

Taree aataa kripaa-karunu | Maayaa-pralaya ghyaa aavarunu | Maga devavaanee shravanee aikuunu | Vaasaneeka astra preritase ||

Ovee 87

तेणें मायाप्रळय हरला । मायाउत्पत्तिप्रयोग राहिला । मग सकळ विमानें उतरुनि महीला । देव नमिति मच्छिंद्राला ॥

Transliteration

Tene maayaa-pralaya haralaa | Maayaa-utpatti-prayoga raahilaa | Maga sakala vimaane utaruni maheelaa | Deva namiti Machchindraa (Machchindraalaa) ||

Ovee 88

ब्रह्मा विष्णु आणि रुद्र । स्तवनें केला शांत मच्छिंद्र । मग संनिध बोलावूनि वीरभद्र । करीं कर ओपिती ॥

Transliteration

Brahmaa Vishnu aani Rudru | Stavane kelaa shaanta Machchindru | Maga sannidha bolaavuuni Veerabhadru | Karee kara opitee ||

Ovee 89

म्हणती कविनारायण मच्छिंद्रनाथ । तरी आपण वाढवावी सदैव प्रीत । ऐसें वीरभद्रातें सांगूनि समस्त । प्रेमें प्रीती वाढविती ॥

Transliteration

Mhanatee kavi-Naaraayana Machchindra Naathu | Taree aapana vaadhavaavee sadaiva preetu | Aise Veerabhadraate saanguuni samastu | Preme preetee vaadhavitee ||

Ovee 90

यावरी बोले रुद्र प्रसन्न होऊन । कीं मच्छिंद्राची कामना कोण । ती मीच पूर्ण करीन । वरदचित्तेंकरुनिया ॥

Transliteration

Yaavaree bole Rudra prasanna houunu | Kee Machchindraachee kaamanaa konu | Tee meecha poorna kareenu | Varadachittenkaruniyaa ||

Ovee 91

धन्य आहे मच्छिंद्रनाथ । युद्धीं कुशल प्रतापवंत । धन्य श्रीगुरु मिळाला त्यातें । प्रतापवंत आगळा ॥

Transliteration

Dhanya aahe Machchindra Naathu | Yuddhee kushala prataapavantu | Dhanya shreeguru milaalaa tyaate | Prataapavanta aagalaa toh ||

Ovee 92

मज समान युद्धनेमीं । पातलो यासी युद्धभूमीं । परी न देखों युद्धसंगमीं । मच्छिंद्रासमान पुरुषार्थ ॥

Transliteration

Maja samaana yuddhanemee | Paatalo yaasee yuddha-bhoomee | Paree na dekho yuddha-sangamee | Machchindraa-samaana purusha-artha ||

Ovee 93

म्यां पूर्वी रावण बळी भांडोन । सुखें देवीवर रणीं आणूनि । किन्नर गंधर्व थकित जाण । नाहीं पुढें ठेले मम युद्धीं ॥

Transliteration

Myaa poorvee Raavana Balee bhaandonu | Sukhe deveevara ranee aanuuni | Kinnara Gandharva thakita jaanu | Naahee pudhe thele mama yuddhee ||

Ovee 94

कल्पांतभैरव मातें नाम । देते झालें सुरासुर उत्तम । माझें जिंकावया युद्धकर्म । मिळाला नाहीं कोणीच ॥

Transliteration

Kalpaantabhairava maate naamu | Dete jhaale suraasura uttamu | Maajhe jinkaavayaa yuddhakarmu | Milaalaa naahee koneechu ||

Ovee 95

परी आजी खातरी कृत्याकृत्य । केली असे मच्छिंद्रनाथें । मग करी कवळूनि हृदयातें । धरिता झाला सप्रेम ॥

Transliteration

Paree aajee khaataree kritya-akrityu | Kelee ase Machchindranaathe | Maga karee kavaluuni hridayaate | Dharitaa jhaalaa sapremu ||

Ovee 96

म्हणे महाराजा योगद्रुमा । वेधक कामना असेल तुम्हा । तरी ती सांगूनि रुद्रोत्तमा । वरदसुखा पहुडवीं ॥

Transliteration

Mhane Mahaaraajaa yogadrumaa | Vedhaka kaamanaa asela tumhaa | Taree tee saanguuni Rudraottamaa | Varada-sukhaa pahudavee ||

Ovee 97

येरु म्हणे बा महाराजा । एक अर्थ तूं करुनि माझा । त्याते फळ देऊनिया जा । लोकोपकारीं मिरवावें ॥

Transliteration

Yeru mhane baa Mahaaraajaa | Eka artha too karuni maajhaa | Pari tyaate deuuniyaa jaa | Loka-upakaaree miravaave ||

Ovee 98

जैसे एक वायूचे आधीन यथार्थ । वर्षाकाळीं मेघ वर्षे जलातें । तेणें तुष्ट होय क्षितींत । चराचर अवघेंही ॥

Transliteration

Jaise eka vaayooche aadheena yathaarthu | Varshaa-kaalee megha varshe jalaate | Tene tushta hoya kshiteentu | Charaachara avaghenhee ||

Ovee 99

तन्याये कामना चित्तीं । विकार सांडी वरली मती । तरी कार्यगंधाच्या बैसोनि अर्थी । लोकोपकारीं मिरवावें ॥

Transliteration

Tannyaaye kaamanaa chittee | Vikaara saandee varalee matee | Taree kaarya-gandhaachyaa baisoni arthee | Loka-upakaaree miravaave ||

Ovee 100

तरी तो अर्थ म्हणाल कोण । महाराजा करा श्रवण । म्यां कामनी वरिला विद्याकाम । साबरीविद्या महाराजा ॥

Transliteration

Taree toh artha mhanaala konu | Mahaaraajaa karaa shravanu | Myaa kaamanee varilaa vidyaakaamu | Saabaree Vidyaa Mahaaraajaa ||

Ovee 101

तरी त्या मंत्रबोलासमान । आपण वहिवाटा ये देहीं धर्म । त्वरें जाऊनि जगाचा काम । मंत्रापाठीं परवावा ॥

Transliteration

Taree tyaa mantrabolaasamaanu | Aapana vahivaataa ye dehee dharmu | Tvare jaauuni jagaachaa kaamu | Mantraapaathee puravaavaa (paravaavaa) ||

Ovee 102

एवं वर ओपूनि मातें । लोट लोटवा कृपासरिते । मग अवश्य म्हणे मच्छिंद्रातें । कार्य सहसा करीन मी ॥

Transliteration

Evam vara opuuni maate | Lota lotavaa kripaa-sarite | Maga avashya mhane Machchindraate | Kaarya sahasaa kareena mee ||

Ovee 103

ऐसें बोलूनि वरदयुक्तीं । करतळा देत प्रसन्नचित्तीं । यापरी सकळ देव बोलती । प्रसन्न होऊनि तयातें ॥

Transliteration

Aise boluuni varada-yuktee | Karatalaa deta prasannachittee | Yaaparee sakala deva bolatee | Prasanna houuni tayaate ||

Ovee 104

म्हणती वीरभद्रें दिधला वर । तया साह्य असों आम्ही समग्र । मंत्रपोटीं कार्य थोर । आम्ही करुं सहसाही ॥

Transliteration

Mhanatee Veerabhadre didhalaa varu | Tayaa saahya aso aamhee samagru | Mantrapotee kaarya thoru | Aamhee karu sahasaahee ||

Ovee 105

ऐसें बोलूनि वरदयुक्ती । मग मच्छिंद्र म्हणे नमस्कार सर्वांप्रती । रुद्र ब्रह्मा चक्रवर्ती । भावेकरुनि नमियेला ॥

Transliteration

Aise boluuni varada-yuktee | Maga Machchindra mhane namaskaara sarvaanpratee | Rudra Brahmaa chakravartee | Bhaave-karuni namiyelaa ||

Ovee 106

विष्णुपदीं ओपितां मौळी । तोही त्यातें कृपें न्याहाळी । परम प्रेमें हृदयकमळीं । धरिता झाला स्नेहाळ तो ॥

Transliteration

Vishnupadee opitaa maulee | Tohee tyaate kripe nyaahaalee | Parama preme hridaya-kamalee | Dharitaa jhaalaa snehaa-la toh ||

Ovee 107

म्हणे वत्सा पूर्णकोटी । जेथें पडतां जीव संकटीं । माझे स्मरण करितां ओंठीं । दृश्य होईन त्या ठाया ॥

Transliteration

Mhane vatsaa poornakotee | Jethe padataa jeeva sankatee | Maajhe smarana karitaa onthee | Drishya hoeena tyaa thaayaa ||

Ovee 108

दृश्य होतां संकटराशी । निवारीन मी निश्चयेसी । मग चक्र अस्त्र देऊनि त्यातें । तुष्ट मानसीं केला तो ॥

Transliteration

Drishya hotaa sankata-raashee | Nivaareena mee nishchayesee | Maga chakra astra deuuni tyaate | Tushta maanasee kelaa toh ||

Ovee 109

यापरी नंदिश उमानाथ । तोही प्रसन्न होऊनि त्यातें । प्रेमें कवळूनि हृदयातें । त्रिशूळास्त्र ओपीतसे ॥

Transliteration

Yaaparee nandisha Umaanaathu | Tohee prasanna houuni tyaate | Preme kavaluuni hridayaate | Trishoola-astra opeetase ||

Ovee 110

यापरी नाभितनया नमितां । तोही वदे प्रसन्नचित्ता । शापादपि सविता । संजोगिलें तयासी ॥

Transliteration

Yaaparee naabhi-tanayaa namitaa | Tohee vade prasanna-chittaa | Shaapaadapi Savitaa | Sanjogile tayaasee ||

Ovee 111

जें वाणीनें निघे अक्षर । तें होय साचोकार । शुभाशुभ कर्मावर । फळें पावती गोमटीं ॥

Transliteration

Je vaaneene nighe aksharu | Tey hoya saachokaaru | Shubha-ashubha karmaavaru | Phale paavatee gomatee ||

Ovee 112

ऐसें वदूनि विधिराज । तुष्ट केला तपोभुज । यापरी शक्र नमी ओज । तोही वर ओपीतसे ॥

Transliteration

Aise vaduuni Vidhiraaju | Tushta kelaa tapobhuju | Yaaparee Shakra namee oju | Tohee vara opeetase ||

Ovee 113

मग वज्रास्त्र कां पूर्ण । त्यातें दिधलें कृपा करुन । मग अस्त्रमंत्र सांगून । वज्रहस्त ओपिला ॥

Transliteration

Maga vajraastra kaa poornu | Tyaate didhale kripaa karunu | Maga astramantra saanguunu | Vajrahasta opilaa ||

Ovee 114

यावरी नमितां देव कुबेर । तोही होऊनियां उदार । सिद्धि देऊनि समग्र । दासी केल्या तयाच्या ॥

Transliteration

Yaavaree namitaa deva Kuberu | Tohee houuniyaa udaaru | Siddhi deuuni samagru | Daasee kelyaa tayaachyaa ||

Ovee 115

यावरी वरुण भावें नमितां । तोंही प्रसन्न होऊनि चित्ता । आपास्त्रमंत्रभोक्ता । केला असे त्वरेनें ॥

Transliteration

Yaavaree Varuna bhaave namitaa | Tonhee prasanna houuni chittaa | Aapa-astramantra-bhoktaa | Kelaa ase tvarene ||

Ovee 116

त्या मंत्राचा होतां पाठ । आपोआप धरेते नीर उठे । सकळ सारितां लोटूनि लोट । दिशे दिशे मिरवती ॥

Transliteration

Tyaa mantra-achaa hotaa paathu | Aapoaapa dharete neera uthe | Sakala saaritaa lotuuni lotu | Dishe dishe miravatee ||

Ovee 117

यापरी नमितां द्विमूर्धनी । तोही आल्हादे चित्तकामनीं । वर दिधला मंत्रअग्नी । स्मरण होतां प्रगटावें ॥

Transliteration

Yaaparee namitaa dvi-moordhanee | Tohee aalhaade chitta-kaamanee | Vara didhalaa mantraagnee | Smarana hotaa pragataave ||

Ovee 118

यापरी नमितां देव अश्विनी । तोही देत मंत्रमोहनी । असो सर्व देवी वरदपाणी । एकएकांनीं ओपिला ॥

Transliteration

Yaaparee namitaa deva Ashvinee | Tohee deta mantra-mohanee | Aso sarva Devee varada-paanee | Eka-ekaannee opilaa ||

Ovee 119

मग आपुलालें आसन योजून । सिद्ध करिते झाले गमन । यावरी मच्छिंद्र कर जोडून । विनवीतसे सकळिकां ॥

Transliteration

Maga aapulaale aasana yojuunu | Siddha karite jhaale gamanu | Yaavaree Machchindra kara joduunu | Vinaveetase sakalikaa ||

Ovee 120

म्हणे महाराजा स्वर्गवासी । मातें कामना वेधली कीं जीवासी । मणकर्णिकास्नान मानवांसी । आदर चित्ती वाटतसे ॥

Transliteration

Mhane Mahaaraajaa svargavaasee | Maate kaamanaa vedhalee kee jeevaasee | Manakarnikaasnaana maanavaansee | Aadara chittee vaatatase ||

Ovee 121

तरी मातें करावया स्नान । न्याल जरी कृपेंकरुन । तरी येऊनियां कामना पूर्ण । करीन आपुली महाराजा ॥

Transliteration

Taree maate karaavayaa snaanu | Nyaala jaree kripenkarunu | Taree yeuuniyaa kaamanaa poornu | Kareena aapulee Mahaaraajaa ||

Ovee 122

ऐसी ऐकूनि वचनयुक्ती । सकळ प्रसन्न झाले चित्तीं । मग स्वयें विमानीं वाहूनि श्रीपती । घेऊनियां चालिला ॥

Transliteration

Aisee aikuuni vachana-yuktee | Sakala prasanna jhaale chittee | Maga svaye vimaanee vaahuuni shreepatee | Gheuuniyaa chaalilaa ||

Ovee 123

विमानयानें आपुले बहुत । त्वरें पातले वैकुंठनाथ । मग आपुले आसनीं मच्छिंद्रनाथ । नेऊनियां बसविला ॥

Transliteration

Vimaanayaane aapule bahutu | Tvare paatale Vaikuntha Naathu | Maga aapule aasanee Machchindra Naathu | Neuuniyaa basavilaa ||

Ovee 124

आसनीं शयनीं भोजनीं । एकत्रपणी वर्ते चक्रपाणी । सकळ देव पातले स्वस्थानी । मच्छिंद्र वैकुंठीं राहिला ॥

Transliteration

Aasanee shayanee bhojanee | Ekatrapanee varte chakra-paanee | Sakala deva paatale svasthaanee | Machchindra Vaikunthee raahilaa ||

Ovee 125

मग नित्य मनकर्णिकेचें स्नान । मच्छिंद्रनाथ येत करुन । यावरी पूर्ण समाधिकारण । पाहूं ऐसें वाटतसे ॥

Transliteration

Maga nitya Manakarnikeche snaanu | Machchindra Naatha yeta karunu | Yaavaree poorna samaadhi-kaaranu | Paahoo aise vaatatase ||

Ovee 126

मग विष्णुसी म्हणे मच्छिंद्रनाथ । मेरुपाठार दाविजे मातें । म्यां समाधि घेतली पूर्वजन्मांत । तयां गोचर करावें ॥

Transliteration

Maga Vishnu-see mhane Machchindra Naathu | Meru-paathaara daavije maate | Myaa samaadhi ghetalee poorvajanmaantu | Tayaa gochara karaave ||

Ovee 127

अवश्य म्हणूनी नारायण । मेरुपाठारीं केले गमन । मग दाही समाधी दृष्टी पाहून । संतुष्ट झाला मानसीं ॥

Transliteration

Avashya mhanuunee Naaraayanu | Merupaathaaree kele gamanu | Maga daahee samaadhee drishtee paahuunu | Santushta jhaalaa maanasee ||

Ovee 128

नवनारायणांच्या समाधी नव । दहावी समाधी वासुदेव । ऐसा पाहूनि मनोभाव । पुनः येत वैकुंठी ॥

Transliteration

Nava Naaraayanaanchyaa samaadhee navu | Dahaavee samaadhee Vaasudevu | Aisaa paahuuni manobhaavu | Puna yeta Vaikunthee ||

Ovee 129

असो एक संवत्सर वैकुंठनाथ । ठेविता झाला प्रीतिवंत । मग पाचारुनि उमाकांत । नेता झाला कैलासासीं ॥

Transliteration

Aso eka sanvatsara Vaikuntha Naathu | Thevitaa jhaalaa preetivantu | Maga paachaaruni Umaakaantu | Netaa jhaalaa Kailaasaasee ||

Ovee 130

तेथेंही एक संवत्सरपर्यंत । राहता झाला मच्छिंद्रनाथ । स्थितिवृत्तीं स्नेह बहुत । वाढविले शिवाचे ॥

Transliteration

Yethenhee eka sanvatsara-paryantu | Raahataa jhaalaa Machchindra Naathu | Sthiti-vrittee sneha bahutu | Vaadhavile Shivaache ||

Ovee 131

यावरी कोणे एके दिवशी । इंद्र येऊनि कैलासासीं । भावें नमूनि महादेवासी । मच्छिंद्रनाथा नेतसे ॥

Transliteration

Yaavaree kone eke divashee | Indra yeuuni Kailaasaasee | Bhaave namuuni mahaadevaasee | Machchindra Naathaa netase ||

Ovee 132

यावरी तीन मास अमरावतीं । राहता झाला योगपती । तेथेही अत्यंत वाढवूनि प्रीती । निरोपातें मागतसे ॥

Transliteration

Yaavaree teena maasa amaraavatee | Raahataa jhaalaa yogapatee | Tethehee atyanta vaadhavuuni preetee | Niropaate maagatase ||

Ovee 133

तों विधीनें नारद पाठवून । नेलें सत्यलोकाकारण । तेथेही षण्मास राहून । विधिराज तोषविला ॥

Transliteration

Toh Vidheene Naarada paatha-vuunu | Nele satya-lokaa-kaaranu | Tethehee shanmaasa raahuunu | Vidhiraaja toshavilaa ||

Ovee 134

यापरी सकळ देव येऊनि तेथ । घेऊनि जाती मच्छिंद्रनाथ । एक एक दिन करुनि तीर्थ । सकळ देवांसी तोषविलें ॥

Transliteration

Yaaparee sakala deva yeuuni tethu | Gheuuni jaatee Machchindra Naathu | Eka eka dina karuni teerthu | Sakala devaansee toshavile ||

Ovee 135

सुरगण गंधर्व किन्नर यक्ष । पितृगयादि अर्यमा दक्ष । सकळ करुनि प्रीतीनें प्रत्यक्ष । तोचि एक मिरवला ॥

Transliteration

Suragana Gandharva Kinnara Yakshu | Pitrigayaadi Aryamaa Dakshu | Sakala karuni preeteene pratyakshu | Tochi eka miravalaa ||

Ovee 136

असो सप्तवर्षेपर्यंत । स्वर्गी राहिला मच्छिंद्रनाथ । सकळांचा गौरव घेऊनि अतिथ । पुसुनिया निघतसे ॥

Transliteration

Aso sapta-varshe-paryantu | Svargee raahilaa Machchindra Naathu | Sakalaanchaa gaurava gheuuni atithu | Pusuniyaa nighatase ||

Ovee 137

मग सकळ निघूनि स्वर्गवासी । बोळविती मच्छिंद्रासी । विमानीं वाहूनि मृत्युलोकासी । आणूनियां घातले ॥

Transliteration

Maga sakala nighuuni svargavaasee | Bolavitee Machchindraasee | Vimaanee vaahuuni mrityulokaasee | Aanuuniyaa ghaatale ||

Ovee 138

असो देव गेले स्वस्थानासी । येरीकडे मच्छिंद्र पृथ्वीसी । पुनः चालिला तीर्थाटनासी । करावया अत्यादरें ॥

Transliteration

Aso Deva gele svasthaanaasee | Yereekade Machchindra prithveesee | Puna chaalilaa teerthaatanaasee | Karaavayaa atyaadare ||

Ovee 139

भ्रमण करितां शुद्धमहीसी । जाता झाला केकाडदेशीं । तें परम स्थान पश्चिमदेशीं । वज्रवन पाहिलें ॥

Transliteration

Bhramana karitaa shuddha-maheesee | Jaataa jhaalaa Kekaadadeshee | Tey parama sthaana Pashchimadeshee | Vajravana paahile ||

Ovee 140

तंव त्या ठायीं वज्रभगवती । महादैवत प्रतापशक्ती । भावें नमूनि अंबिकामूर्ति । तीर्थस्नान करीतसे ॥

Transliteration

Tanva tyaa thaayee Vajra-Bhagavatee | Mahaa-daivata prataapa-shaktee | Bhaave namuuni Ambikaamoorti | Teertha-snaana kareetase ||

Ovee 141

तेथें तीनशें साठ कुंडे असती । परी उष्णोदकें भरलीं असती । तें पाहूनि परम चित्तीं । आश्चर्यातें मानीतसे ॥

Transliteration

Tethe teenashe saatha kunde asatee | Paree ushnodake bharalee asatee | Tey paahuuni parama chittee | Aashcharyaate maaneetase ||

Ovee 142

आश्चर्य मनांत योजूनि करित । कीं उष्णोदकें कुंडे भरित । तरी तयांची राहणी पुसुनि कोणास । आपण कुंडे निर्मावी ॥

Transliteration

Aashcharya manaanta yojuuni karitu | Kee ushnodake kunde bharitu | Taree tayaanchee raahanee pusuni konaasu | Aapana kunde nirmaavee ||

Ovee 143

निर्मूनि ये परी सर्वांहून । परमागळें उष्णोदक जीवन । मग सकळ तीर्थात करुनि स्नान । भगवतीठाया पातला ॥

Transliteration

Nirmuuni ye paree sarvaanhuunu | Paramaagale ushnodaka jeevanu | Maga sakala teerthaata karuni snaanu | Bhagavatee-thaayaa paatalaa ||

Ovee 144

पाचारुनि तीर्थाच्या पुजार्यासी । वृतांत पुसीला उष्णोदकासी । विचारितां सांगे त्यासी । उष्णोदककारण ते ॥

Transliteration

Paachaaruni teerthaachyaa pujaaryaasee | Vritaanta puseelaa ushnodakaasee | Vichaaritaa saange tyaasee | Ushnodaka-kaarana tey ||

Ovee 145

म्हणे पूर्वीं वसिष्ठें यज्ञ केला । तेव्हां सकळ देव पातले स्नानाला । त्यांनीं निर्मूनि उष्णोदकाला । कुंडे केलीं आपुलालीं ॥

Transliteration

Mhane poorvee Vasishthe yajnya kelaa | Tevhaa sakala Deva paatale snaanaalaa | Tyaannee nirmuuni ushnodakaalaa | Kunde kelee aapulaalee ||

Ovee 146

उष्णोदकीं स्नानाकरितां तात्कालिक । निर्मिते झाले सकळिक । आपुलीं नामें अलोलिक । कुंडांलागीं ठेविलीं ॥

Transliteration

Ushnodakee-snaanaa karitaa taatkaaliku | Nirmite jhaale sakaliku | Aapulee naame aloliku | Kundaanlaagee thevilee ||

Ovee 147

द्वादश वरुषें द्वादश दिवस । समस्त राहिले त्या ठायास । यज्ञ पावलिया पूर्णतेस । सकळ गेले स्वस्थाना ॥

Transliteration

Dvaadasha varushe dvaadasha divasu | Samasta raahile tyaa thaayaasu | Yajnya paavaliyaa poornatesu | Sakala gele svasthaanaa ||

Ovee 148

तीं कुंडें अद्यापपर्यंत । स्थानोस्थानीं आहेत । ऐसें ऐकूनि मच्छिंद्रनाथ । म्हणे योजिलें करावें ॥

Transliteration

Tee kunde adyaapaparyantu | Sthaano-sthaanee aahetu | Aise aikuuni Machchindra Naathu | Mhane yojile karaave ||

Ovee 149

मग सरस्वतीसरितापात्रीं । जी उंचवट जागा तया क्षेत्रीं । पाहुनि वाटिका पवित्र नेत्रीं । वरुणमंत्र जल्पतसे ॥

Transliteration

Maga Sarasvatee-saritaa-paatree | Jee unchavata jaagaa tayaa kshetree | Paahuni vaatikaa pavitra netree | Varuna-mantra jalpatase ||

Ovee 150

आपास्त्रमंत्रउच्चार पूर्ण । होतांचि प्रविष्ट झालें जीवन । भोगावतीचें उदक काढून । अग्निमंत्र जल्पतसे ॥

Transliteration

Aapa-astramantra-uchchaara poornu | Hotaanchi pravishta jhaale jeevanu | Bhogaavateeche udaka kaadhuunu | Agnimantra jalpatase ||

Ovee 151

अग्निमंत्र उच्चार होतां । प्रवाहीं लागला हुताशन तत्त्वतां । तेणेंकरुनि हुताशनतप्तता । पावती झाली ते समयी ॥

Transliteration

Agnimantra uchchaara hotaa | Pravaahee laagalaa hutaashana tattvataa | Tenenkaruni hutaashana-taptataa | Paavatee jhaalee tey samayee ||

Ovee 152

शिववरदकरीं त्रिशूळ हातीं । तो बुडाकडोनि टाकिला महीमायीं । तेणेकरुनि जीवन तप्त कुंडाप्रती । महीलागीं विराजलें ॥

Transliteration

Shiva-varada-karee Trishoola haatee | Toh budaakadoni taakilaa Maheemaayee | Tenekaruni jeevana tapta kundaapratee | Mahee-laagee viraajale ||

Ovee 153

भोगावतीचें उत्तम उदक । प्रगट होतां अलोलिक । आपण स्नान करोनि शुचिक । करी भगवती मातेतें ॥

Transliteration

Bhogaavateeche uttama udaku | Pragata hotaa aloliku | Aapana snaana karoni shuchiku | Karee Bhagavatee maatete ||

Ovee 154

भोगावतीचे उत्तम जीवन । अंबिकेप्रति होतां स्नान । मग ती मच्छिंद्रा प्रत्यक्ष होऊन । बोलती झाली सम्यक ॥

Transliteration

Bhogaavateeche uttama jeevanu | Ambikeprati hotaa snaanu | Maga tee Machchindraa pratyaksha houunu | Bolatee jhaalee samyaka ||

Ovee 155

म्हणे जिवलगा मच्छिंद्रनाथा । धन्य तूं प्रतापवंता । भोगावती जीवनानें मातें । स्नान घातलें योगींद्रा ॥

Transliteration

Mhane jivalagaa Machchindra Naathaa | Dhanya too prataapavantaa | Bhogaavatee jeevanaane maate | Snaana ghaatale yogeendraa ||

Ovee 156

तरी येथें एकमास वस्तीस वसावें सावकाश । मग बोळवीन स्वस्थचित्तास । तुजलागीं पुढारां ॥

Transliteration

Taree yethe ekamaasa vasteesa vasaave saavakaashu | Maga bolaveena svasthachittaasu | Tujalaagee pudhaaraa ||

Ovee 157

अवश्य म्हणोनि मच्छिंद्रनाथ । राहता झाला मास तेथ । मग रुचल्या अर्थी बोले देवीतें । बोलूनि काळ क्रमीतसे ॥

Transliteration

Avashya mhanoni Machchindra Naathu | Raahataa jhaalaa maasa tethu | Maga ruchalyaa arthee bole deveete | Boluuni kaala krameetase ||

Ovee 158

यावरी कोणे एके दिवशीं । मच्छिंद्र म्हणे अंबिकेसी । वज्रबाई नाम तुजसी । काय म्हणूनि सांगा हें ॥

Transliteration

Yaavaree kone eke divashee | Machchindra mhane Ambikesee | Vajrabaaee naama tujasee | Kaaya mhanuuni saangaa hey ||

Ovee 159

माता म्हणे तपोघना । वसिष्ठ करिता जाहला हवना । तें शक्र पातला स्थाना । यालागीं महाराजा ॥

Transliteration

Maataa mhane tapoghanaa | Vasishtha karitaa jaahalaa havanaa | Tey Shakra paatalaa sthaanaa | Yaalaagee Mahaaraajaa ||

Ovee 160

तंव सभास्थानीं सकळ ऋषी । बैसले होते महातापसी । तों इंद्र पातला देवकटकेंसी । सभास्थानीं बैसावया ॥

Transliteration

Tanva sabhaasthaanee sakala Rishee | Baisale hote mahaataapasee | Toh Indra paatalaa Deva-katakensee | Sabhaasthaanee baisaavayaa ||

Ovee 161

सभेंत येतां शचीनाथे । उत्थापन दिधलें नाहीं त्यातें । म्हणूनि क्षोभे अमरनाथ । वज्र लागीं प्ररितसे ॥

Transliteration

Sabhenta yetaa Shacheenaathe | Utthaapana didhale naahee tyaate | Mhanuuni kshobhe Amaranaathu | Vajra laagee praritase ||

Ovee 162

तें पाहूनियां दाशरथी राम । शक्तिमंत्रे दर्भ मंत्रून । सोडिता झाला वज्राकारण । बहु तांतडी लगबगें ॥

Transliteration

Tey paahuuniyaa Daasharathee Raamu | Shaktimantre darbha mantruunu | Soditaa jhaalaa Vajraakaaranu | Bahu taantadee lagabage ||

Ovee 163

मग त्या दर्भी मंत्रप्रयुक्ती । मी प्रगट झालें महाभगवती । वज्र गिळूनि उदर आहुती । करिते झालें ते समयीं ॥

Transliteration

Maga tyaa darbhee mantra-prayuktee | Mee pragata jhaale Mahaa-Bhagavatee | Vajra giluuni udara aahutee | Karite jhaale tey samayee ||

Ovee 164

यावरी शक्रें राम तो बोलून । पूर्ण केला समाधान । मग श्रीरामाचे स्तवन करुन । वज्र पुन्हां मागितलें ॥

Transliteration

Yaavaree Shakre Raama toh boluunu | Poorna kelaa samaadhaanu | Maga Shreeraamaache stavana karunu | Vajra punhaa maagitale ||

Ovee 165

मग तो प्रसन्न होऊनि चित्तीं । वज्र दिधलें मागुती । मग सकळ ऋषिदेवी मजप्रती । नांव ऐसें स्थापिलें ॥

Transliteration

Maga toh prasanna houuni chittee | Vajra didhale maagutee | Maga sakala Rishidevee majapratee | Naanva aise sthaapile ||

Ovee 166

यज्ञ जाहला समाप्ती । सकळ गेले स्नानाप्रती । परी श्रीरामें येऊनि ते क्षितीं । मातें स्थापिलें अद्यापि ॥

Transliteration

Yajnya jaahalaa samaaptee | Sakala gele snaanaapratee | Paree Shreeraame yeuuni tey Kshitee | Maate sthaapile adyaapi ||

Ovee 167

ती भोगवती येथें श्रेष्ठा । माझी केली प्राणप्रतिष्ठा । तें भोगावतीचें उदक श्रेष्ठा । मिळालें होते मजलागीं ॥

Transliteration

Tee Bhogavatee yethe shreshthaa | Maajhee kelee praana-pratishthaa | Tey Bhogaavateeche udaka shreshthaa | Milaale hote majalaagee ||

Ovee 168

किंवा आतां तुझे हातीं । स्नाना पावली भोगावती । परी रामाहूनि कृपामूर्ती । तुवां अधिक केले बा ॥

Transliteration

Kinvaa aataa tujhe haatee | Snaanaa paavalee Bhogaavatee | Paree Raamaahuuni kripaa-moortee | Tuvaa adhika kele baa ||

Ovee 169

रामें न्हाणिलें शीतोदकें । तुवां न्हाणिलें उष्णोदकें । आणि अखंडित पुण्यश्लोकें । भोगावती दिधली त्वां ॥

Transliteration

Raame nhaanile sheetodake | Tuvaa nhaanile ushnodake | Aani akhandita punyashloke | Bhogaavatee didhalee tvaa ||

Ovee 170

असो ऐशी संवादयुक्ती । झाल्याअंती त्या उभयतीं । उपरी मासाची झाली भरती । नाथ पुसूनी निघाला ॥

Transliteration

Aso aishee sanvaada-yuktee | Jhaalyaaantee tyaa ubhayatee | Uparee maasaachee jhaalee bharatee | Naatha pusuunee nighaalaa ||

Ovee 171

उत्तरदेशीं करितां गमन । अयोध्यें जातां तपोवन । द्वारावती तीर्थ करुन । अयोध्येसी पातला ॥

Transliteration

Uttaradeshee karitaa gamanu | Ayodhye jaataa tapodhanu | Dvaaraavatee teertha karunu | Ayodhye se paatalaa ||

Ovee 172

ती कथा बहु सुरस । होईल ती स्वीकारा पुढिले अध्यायास । धुंडीसुत नरहरिवंश । मालू सांगे गुरुकृपें ॥

Transliteration

Tee kathaa bahu surasu | Hoeela tee sveekaaraa pudhile adhyaayaasu | Dhundeesuta Naraharivanshu | Maaloo saange gurukripe ||

Ovee 173

स्वस्ति श्रीभक्तिकथासार । गोरक्षकाव्य किमयागार । सदा परिसोत भाविक चतुर । सप्तमाध्याय गोड हा ॥

Transliteration

Svasti Shreebhaktikathaa Saaru | Goraksha Kaavya Kimayaagaaru | Sadaa parisota bhaavika chaturu | Saptamaadhyaaya goda haa ||

श्रीकृष्णार्पणमस्तु । श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

Shri Krishnarpanamastu | Shri Dattatreyarpanamastu

इति श्रीनवनाथभक्तिसार सप्तमाध्याय संपूर्ण ।

Iti Shri Navnath Bhaktisar Adhyaya Saptama Sampurnah